स्थापना : दि. ५ मे २००८
नों.क्र.महा./२४९२९/को./११/०७/०८

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विद्वत्प्रमाणित त्रैमासिक

# शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed Referred Research Journal) ISSN No. 2319-6025
(विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली मान्यता अ. क्र. ६४१७५)
वर्ष पंधरावे : अंक पंचेचाळीसावा व शेहेचाळीसावा
जानेवारी-फेब्रुवारी-मार्च, एप्रिल-मे-जून २०२६ (जोडअंक)
राष्ट्रीय चर्चासत्र विशेषांक

# २००० नंतरची मराठी कथा




रयत शिक्षण संस्थेचे

## सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा

दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र व अधिवेशन
२००० नंतरची मराठी कथा

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विद्वत्प्रमाणित त्रैमासिक

# शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed Referred Research Journal) ISSN No. 2319-6025
(विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली मान्यता अ. क्र. ६४१७५)
वर्ष पंधरावे : अंक पंचेचाळीसावा व शेहेचाळीसावा
जानेवारी-फेब्रुवारी-मार्च, एप्रिल-मे-जून २०२६ (जोडअंक)







## २000 नंतरची मराठी कथा
## राष्ट्रीय चर्चासत्र विशेषांक

अतिथी संपादक
प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे
डॉ. कांचन नलवडे
डॉ. जयश्री बाबर
प्रा. निरंजन फरांदे

संपादन सहाय्य
डॉ. अशोक तवर
प्रा.(डॉ.) अशोक शेलार
डॉ. विनायक राऊत

पत्रिका संपादक मंडळ
संपादक
प्रा.(डॉ.) नंदकुमार मोरे

सदस्य
प्रा.(डॉ.) देवानंद सोनटक्के
डॉ. जयवंत दळवी
डॉ. सुभाष पाटील
डॉ. बळवंत मगदूम

प्रकाशक
डॉ. भरत जाधव
अध्यक्ष, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर
द्वारा: द्वारकाधिश, साईनगरी, नागठाणे, ता.जि. सातारा : ४१५५१९

मुद्रक
कलाविष्कार ग्राफिक्स्, सातारा
सिद्धेश्वर प्लाझा, शॉप नं.५, अमेटी कॉर्नर, सदरबझार, सातारा
मोबा.९५०३७८०६२८

शिविम संशोधन पत्रिका

२000 नंतरची मराठी कथा

2319 6025
ISSN No. 2319-6025

हो संशोधन पत्रिका प्रकाशक डॉ.भरत जाधव, यांनी शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर यासाठी कलाविष्कार ग्राफिक्स्, सातारा येथे छापून द्वारकाधिश, साईनगरी, नागठाणे, ता.जि.सातारा ४१५५१९ येथे प्रकाशित केली. या पत्रिकेत प्रकट झालेल्या मतांशी संपादक, प्रकाशक व मुद्रक सहमत असतीलच असे नाही.

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १. | 'आयुष्याचे धडे गिरवताना' मधील मानवतावादी मूल्ये | प्राचार्य डॉ.शिवलिंग मेनकुदळे | ०१ |
| २. | २००० नंतरची मराठी कथा आणि विखारी पुरुषी मानसिकता (Manosphere) | डॉ.भरत जाधव | ०७ |
| ३. | आसाराम लोमटे यांची कथा | प्रा.(डॉ.)मांतेश हिरेमठ | १६ |
| ४. | २००० नंतरची गोमंतकीय मराठी कथा : काही निरीक्षणे | डॉ.जयप्रभू कांबळे | १९ |
| ५. | एकविसाव्या शतकातील आदिवासी कथा : स्थिती आणि गती | प्रा.(डॉ.)कृष्णा भवारी | २३ |
| ६. | २००० नंतरच्या मराठी कथेचे वेगळेपण | डॉ.अशोक तवर | २८ |
| ७. | २००० नंतरची स्त्रीलिखीत विज्ञान कथा | प्रा.(डॉ.)विठ्ठल रोटे | ३३ |
| ८. | २००० नंतरची निवडक दीर्घकथा | प्रा.(डॉ.)प्रकाश दुकळे | ३७ |
| ९. | रेड लाइट डायरीज... : सामाजिक व भाषिक अभ्यास | प्रा.(डॉ.)अरुण शिंदे | ४० |
| १०. | प्रज्ञा पवार यांच्या कथेचे आशयलक्ष्यी विवेचन | प्रा.(डॉ.)सर्जेराव पद्माकर | ४५ |
| ११. | २००० नंतरच्या मराठी कथेतील कथनपरता | डॉ.तेजस चव्हाण | ५० |
| १२. | २००० नंतरच्या मराठी कथेची स्थित्यंतरे | डॉ.विजय शिंदे | ५४ |
| १३. | समकालीन भोवतालातील विदीर्ण अनुभवांचा कोलाज :<br>'दोन शतकांच्या सांध्यावरच्या नोंदी' | डॉ.सागर पाटील | ५७ |
| १४. | सुखदेव नवले यांच्या कथा साहित्याची समाजशास्त्रीय मिमांसा | डॉ.रामदास नाईकनवरे | ६१ |
| १५. | २००० नंतरच्या मराठी आदिवासी कथेतील स्त्री चित्रण | डॉ.कांचन नलावडे | ६४ |
| १६. | आजच्या काळाच्या अवस्थांतराची कथा | प्रा.(डॉ.)एकनाथ आळवेकर | ६८ |
| १७. | २००० नंतरची मराठी कथा: समकालीन प्रवाह आणि स्थित्यंतरे | प्रा.(डॉ.)डी.जे.दमामे | ७० |
| १८. | २००० नंतरचे व्यामिश्र जीवन आणि ग्रामीण कथा | डॉ.गवराम पोटे | ७६ |
| १९. | मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथालेखनाचे स्वरूप | डॉ.प्राजक्ता निकम | ८० |
| २०. | इ.स. २००० नंतरची मराठी कथा :<br>सामाजिक वास्तव, ग्रामीण-नागरी संक्रमण व कथात्मक प्रवृत्ती | प्रा.(डॉ.)एकनाथ पाटील | ८६ |
| २१. | २००० नंतरच्या मराठी ई-कथेतील प्रयोगशीलता | डॉ.विद्या नावडकर | ९३ |
| २२. | नीरजा यांचे २००० नंतरचे कथालेखन : एक आकलन | डॉ.विलास सुर्वे | ९९ |
| २३. | 'परिव्राजक' आणि 'जयंती' या कथासंग्रहातील विविध कलांचे चित्रण | प्रा.(डॉ.) प्रशांत गायकवाड | १०२ |
| २४. | २००० नंतरची मुस्लिम मराठी कथा - जाणिवा आणि वैशिष्ट्ये | प्रा.मोहन चव्हाण | १०५ |
| २५. | एकविसाव्या शतकातील मराठी आदिवासी कथा | डॉ. विनायक राऊत | १०९ |
| २६. | ई-कथा : मराठी कथा लेखनाचा नवीन प्रवाह | डॉ.मनीषा नायकवडी | ११२ |
| २७. | २००० नंतरच्या बोधकथांमधील मानवी मूल्ये | प्रा.(डॉ.)सविता व्हटकर | ११५ |
| २८. | किरण गुरव यांच्या कथा : तंत्रज्ञान प्रभावित नवभांडवली समाजव्यवस्था | डॉ.गुंडोपंत पाटील | ११९ |
| २९. | राजन गवस यांच्या 'रिगणावायली मुंगी' कथासंग्रहातील स्त्री-अस्मितेचा शोध | डॉ.प्रकाश हुलेनवर | १२३ |
| ३०. | लिंगभावाची नावीन्यपूर्ण मांडणी करणारी कथा<br>(मनस्विनी लता रवींद्र यांच्या कथालेखनाच्या अनुषंगाने) | डॉ.वैजयंतीमाला जाधव | १२७ |



ISSN No. 2319-6025
जानेवारी-फेब्रुवारी-मार्च, एप्रिल-मे-जून २०२६

| | | | |
|---|---|---|---|
| ३१. | वृषाली मगदूम यांच्या कथेतील स्त्रीजीवनाचे चित्रण | प्रा.(डॉ.)सुभाष आहेर | १३० |
| ३२. | दर्पण: स्त्रीअनुभवांचे प्रतिबिंब | डॉ.शीतल चौरे<br>डॉ.अतुल चौरे | १३३ |
| ३३. | २००० नंतरच्या पारंपरिक स्त्री कथालेखनातील स्त्रीवाद आणि ई-कथालेखनातील स्त्रीवाद : तुलनात्मक अभ्यास | डॉ.सुवर्णा पाटील | १३८ |
| ३४. | २००० नंतरच्या मराठी दलित कथेतील स्त्री चित्रण | प्रा.(डॉ.)चंद्रकांत कांबळे | १४१ |
| ३५. | धर्मराज निमसरकर यांच्या 'अंतहीन' कथासंग्रहाचा वाङ्मयीन अभ्यास | प्रा.सुभाष कदम | १४४ |
| ३६. | परिस्थितीने हरवलेल्या माणसांचा शोध घेणारा कथाकार : सीताराम सावंत | प्रा.(डॉ.)रमेश शिंदे | १४७ |
| ३७. | प्रज्ञा दया पवार यांच्या कथेतील आशयसूत्रे | शितल सालवाडगी | १५१ |
| ३८. | २००० नंतरची स्त्रीवादी कथा | प्रा.प्रांजली ढेरे | १५४ |
| ३९. | २००० नंतरच्या ग्रामीण कथेतील बदलते ग्रामवास्तव | प्रा.(डॉ.)सोमनाथ फुगट | १५७ |
| ४०. | २००० नंतरच्या मराठी कथेतील विषयवैविध्य | डॉ.अनिता आंबोकर | १६१ |
| ४१. | २००० नंतरच्या मराठी कथेमधील भाषा, शैली आणि कथन तंत्रातील नवे प्रयोग | प्रा.(डॉ.)संतोषकुमार डफळापूरकर | १६५ |
| ४२. | निरंजन घाटे यांच्या विज्ञानकथांतील विश्व : एक अभ्यास | डॉ.लक्ष्मण बोराटे | १६८ |
| ४३. | मराठवाड्यातील २००० नंतरच्या ग्रामीण कथा | डॉ.सविता रोटे | १७२ |
| ४४. | २००० नंतरच्या कथेची समाजशास्त्रीय समीक्षा | प्रा.शिल्पा कुंभार | १७६ |
| ४५. | गोमंतकीय कथाकार विठ्ठल गावस यांची कथा | वीणा केरीकर | १७९ |
| ४६. | झांबळ: ग्रामीण जीवनाचे वास्तव चित्रण | प्रा.कल्याणी नायकवडी | १८३ |
| ४७. | आसाराम लोमटे यांच्या कथांमधील स्त्रीचित्रण | प्रा.सुलोचना दंतराव | १८८ |
| ४८. | 'हुब्लकवाडी' या कथासंग्रहातील व्यक्तिचित्रणातील विविधता | प्रा.(डॉ.)बाबासाहेब नाईक | १९२ |
| ४९. | 'मिळून साऱ्याजणी' मधील स्त्री जाणीवा स्पष्ट करणाऱ्या कथा | प्रा.(डॉ.)जयकुमार चंदनशिवे | १९५ |
| ५०. | २००० नंतरच्या मराठी ख्रिस्ती कथेचे वेगळेपण | प्रा.अविनाश भोरे | १९८ |
| ५१. | राब : निसर्ग जाणीवांचा मूल्य विचार | प्रा.यशवंत भांडकोळी<br>प्राचार्य डॉ.शंकर मुंडे | २०५ |
| ५२. | २००० नंतरच्या मराठी कथा | प्रा.सोनाली पवार | २१० |
| ५३. | २००० नंतरच्या महानगरीय कथा | डॉ.आशालता खोत | २१२ |
| ५४. | गेल्या दशकातील दलित कथेचा वैचारिक व आशयात्मक आलेख | डॉ.विनोद कांबळे | २१६ |
| ५५. | मराठी कथांमधील पारलिंगींच्या व्यथा | अनुराधा पाटील | २२० |
| ५६. | २००० नंतरच्या स्त्रिलिखित कथेची भाषा आणि निवेदनशैली | डॉ.श्रद्धा पाटील | २२४ |
| ५७. | एकविसाव्या शतकातील मराठी कथेची वाटचाल | निशा नरवडे | २२७ |
| ५८. | ललिता गादगे यांच्या कथेतील स्त्री जीवन | डॉ.शशिकला रणदिवे | २३० |
| ५९. | २००० नंतरच्या मराठी कथेचे माध्यमांतर : स्वरूप, माध्यमे आणि मर्यादा | अश्विनी माने | २३४ |
| ६०. | जयंत पवार यांच्या 'फिनिक्सच्या राखेतून उठला मोर' मधील महानगरीय संवेदना | प्रा.माधवी पवार | २३७ |



ISSN No. 2319-6025
जानेवारी-फेब्रुवारी-मार्च, एप्रिल-मे-जून २०२६

| | | | |
|---|---|---|---|
| ६१. | एकविसाव्या शतकातील स्त्रीवादी कथांची वाटचाल | प्रा.प्रवीण गायकर | २४० |
| ६२. | संविधानिक मूल्य प्रभावित असणारी सुखदेव नवले यांची कथा | सौ.हेमलता डांगे<br>प्रा.(डॉ.)दत्तात्रय डांगे | २४६ |
| ६३. | सानिया यांच्या कथांमधील स्त्री जीवनाचे चित्रण | प्रा.सुवर्णा यमगर | २४८ |
| ६४. | मिलिंद बोकील यांच्या 'झेन गार्डन' कथासंग्रहातील नवनैतिकता | डॉ.रेखा पसाले | २५३ |
| ६५. | बळीराजासाठी लढणारी 'इडापिडा टळो' या दीर्घकथेची नायिका सीताबाई... | डॉ.नवनाथ गुंड | २५७ |
| ६६. | आदिवासी कथेतील स्त्री शिक्षणाची मीमांसा | डॉ.केशव टिपरसे | २६० |
| ६७. | ई-कथा - मराठी कथा लेखनाचा नवा प्रवाह | श्री.दऱ्याप्पा गोडसे | २६३ |
| ६८. | २१ व्या शतकातील मराठी आणि गुजराती दलित कथा : एक अभ्यास | डॉ.अमोल कवडे | २६७ |
| ६९. | एकविसावे शतक आणि मराठी कथेची वाटचाल | प्रा.स्वाती कळंबे | २७१ |
| ७०. | प्रतिमा इंगोले यांच्या 'अमंगल युग' या कथासंग्रहाचा चिकित्सक अभ्यास | डॉ.सविता माळी | २७३ |
| ७१. | सुबोध जावडेकर यांची विज्ञानकथा | डॉ.अजित देसाई | २७७ |
| ७२. | ई-कथा : मराठी कथा लेखनाचा नवा प्रवाह | डॉ.जयश्री शिंदे-गायकवाड | २८० |
| ७३. | २००० नंतरची मराठी कथा | दिपाली खर्डे | २८४ |
| ७४. | जी. के. ऐनापुरे यांचे कथालेखन | प्रा.सुनील बुद्धनावर | २८९ |
| ७५. | विज्ञानकथा आणि मानवी प्रश्न : 'बीटा एकशे तेवीस' | मनीषा पाटील | २९३ |
| ७६. | २००० नंतरची दलित कथा | डॉ.दिवाकर सदांशिव | २९६ |
| ७७. | ललिता गादगे यांच्या कथेतील स्त्री | डॉ.अमोगसिद्ध चेंडके | २९९ |
| ७८. | सुधा मूर्ती यांच्या अनुवादित कथा | डॉ.संगीता सोमवंशी | ३०१ |
| ७९. | २१ वे शतक : स्त्री जाणिवांचे नवे क्षितिज<br>(प्रज्ञा दया पवार यांच्या कथांच्या अनुषंगाने) | डॉ.रेश्मा दिवेकर | ३०५ |
| ८०. | सानिया यांच्या कथेतील स्त्रियांचे भावविश्व | डॉ.लता कदम (ऐवळे) | ३०९ |
| ८१. | २००० नंतरची मराठी ग्रामीण कथा | डॉ.शीतल पाटील | ३१२ |
| ८२. | २००० नंतरच्या मराठी कथेचे स्वरूप | सौ.शैलजा हुबाले<br>प्रा.(डॉ.)अशोक शिंदे | ३१५ |
| ८३. | २००० नंतरच्या ग्रामीण कथेतील विषयवैविध्य | प्रा.(डॉ.)बाळासाहेब देविकर | ३१८ |
| ८४. | विज्ञानकथा संकल्पना व स्वरूप | प्रा.रोहिणी रेळेकर | ३२२ |
| ८५. | एकविसाव्या शतकातील स्त्रीवादी कथा | सुनील आहिरे | ३२७ |
| ८६. | नीलिमा बोरवणकर यांच्या कथेची भाषा ('दूरचे डोंगर'च्या अनुषंगाने) | प्रा.भारती कोळेकर | ३३० |
| ८७. | आदिवासींचे समग्र जीवन व्यापणारी २००० नंतरची मराठी आदिवासी कथा | प्रा.डॉ.एकनाथ आहेर | ३३३ |
| ८८. | २००० नंतरच्या ग्रामीण कथेतील बदलते जीवन | डॉ.धनंजय निंबाळकर | ३३६ |
| ८९. | गौतमीपुत्र कांबळे यांच्या कथा साहित्याचा वेध | श्री.निलेश काळे | ३४० |
| ९०. | 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका' या नियतकालिकातील<br>इ.स. २००० नंतरच्या कथा साहित्याची समीक्षा | वर्षा घाडगे | ३४४ |
| ९१. | २००० नंतरच्या मराठी कथेतील विषयवैविध्य | प्रा.मोहिनी सावंत | ३४७ |



ISSN No. 2319-6025
जानेवारी-फेब्रुवारी-मार्च, एप्रिल-मे-जून २०२६

| | | | |
|---|---|---|---|
| ९२. | 'मुराळी' मासिकातील २००० नंतरच्या कथांचा अभ्यास | प्रा.(डॉ.) संभाजी कदम | ३५० |
| ९३. | अरुणा ढेरे यांच्या कथा : आत्मशोध आणि जीवनार्थ | प्रा.सुचित्रा सोलनकर | ३५५ |
| ९४. | ग्रामीण जीवनाचे वास्तव चित्रण : खुंदळघास | प्रा.सचिन सवने | ३५९ |
| ९५. | समृद्ध आशयाचा गोमंतकीय कथासंग्रह - 'गावबंधू' | प्रा.(डॉ.)धनंजय होनमाने | ३६४ |
| ९६. | 'मातीतली माणसं' - ग्रामीण समाजवास्तवाचा अभ्यास | प्रा.(डॉ.)मानसी जगदाळे | ३६६ |
| ९७. | 'संस्कार शिदोरी' कथासंग्रहातील बालभावविश्व व नैतिक मूल्ये | डॉ.मच्छगंधाली तारळेकर | ३६९ |
| ९८. | इ.स. २००० नंतरच्या कथेतील संघर्ष | दिपाली कसबे | ३७१ |
| ९९. | २००० नंतरच्या दलित कथेचे वाङ्मयीन मूल्यमापन | प्रा.(डॉ.)बाळासाहेब सोनवणे | ३७४ |
| १००. | 'रुजवातीच्या गोष्टी' मधील कोकणी व्यक्तिरेखा | श्री.ज्ञानेश्वर भंडलकर | ३७६ |
| १०१. | मराठी कथेची बदलती रूपे | डॉ.सुभाष बसगोंडा पाटील | ३८० |
| १०२. | २००० नंतरच्या मराठी ग्रामीण कथेची भाषाशैली | डॉ.महादेव जाधव | ३८४ |
| १०३. | 'माझे विद्यार्थी' कथासंग्रहातील निवडक कथांचे शैक्षणिक व सामाजशास्त्रीय विश्लेषण | प्रा.(डॉ.)दत्तात्रय डांगे | ३८७ |
| १०४. | 'सटवाई' कथासंग्रहातील लोकजीवन | प्रा.(डॉ.)रेखा अढाव | ३९४ |
| १०५. | जगण्याचा शोध घेणारा कथासंग्रह 'अलोक' | प्रा.(डॉ).सुनिता रोकडे | ३९७ |
| १०६. | 'वाजागाजा' कथासंग्रह : आकलन आणि आस्वाद | प्रा.कांचन थोरात | ४०० |
| १०७. | २००० नंतरच्या कथेतील सामाजिक-सांस्कृतिक बदलांचे चित्रण | डॉ.हनुमंत निमसे | ४०३ |
| १०८. | राजन गवस यांच्या कथेतील मानवी मूल्ये ('आपण माणसात जमा नाही' च्या अनुषंगाने) | संतोष लोंढे | ४०६ |
| १०९. | स्त्रीवादी साहित्य प्रवाहातील २००० नंतरची स्त्रीवादी कथा | प्रा.(डॉ.)मनीषा नागपुरे | ४०९ |
| ११०. | 'अस्वस्थ मी, अशांत मी': अंतर्मुख स्त्रीवादाचा शोध | प्रा.स्मिता कालभूषण | ४१२ |
| १११. | २००० नंतरच्या स्त्री कथाकरांच्या कथेतील प्रयोगशीलता | प्रा.(डॉ.)गजानन भोसले | ४१५ |
| ११२. | मराठवाड्यातील दलित आंबेडकरवादी कथांमधील परिवर्तनशील स्वरूप | कु.अपूर्वा पवार | ४२० |
| ११३. | २१ व्या शतकातील आदिवासी लोककथांची प्रस्तुतता | प्रा.(डॉ.)डी.के.वळवी | ४२२ |
| ११४. | मिलिंद म्हामल लिखित 'चतुर्थी' मधील जीवनजाणिवा | डॉ.भक्ती महाजन | ४२५ |
| ११५. | 'आर्त' या कथासंग्रहातील स्त्री मनाचे दर्शन | डॉ.वैशाली गुंजेकर | ४२८ |
| ११६. | 'पावसात सूर्य शोधणारी माणसं' एक चिकित्सा | डॉ.सुचिता औंधकर | ४३१ |
| ११७. | २००० नंतरची कोकणातील दलित कथा | डॉ.विजयालक्ष्मी देवगोजी | ४३४ |
| ११८. | 'अनोळखी' : मानवी नात्यातील परात्मतेची जाणीव गडद करणारी कथा | प्रा.(डॉ.)कल्पना गोरले | ४३७ |
| ११९. | सदानंद देशमुख व आसाराम लोमटे यांच्या कथेतील जीवनचित्रण | प्रा.शैला क्षीरसागर | ४३९ |
| १२०. | २००० नंतरच्या कथेची समाजशास्त्रीय, मानसशास्त्रीय आणि स्त्रीवादी समीक्षा | सौ.तरन्नुम शेख | ४४२ |
| १२१. | मनीषा चराटे यांच्या 'चेहरा' कथासंग्रहातील जीवनचित्रण | श्रीमती साधना जाधव | ४४५ |
| १२२. | २००० नंतरच्या मराठी कथेतील विषय वैविध्य | डॉ.स्नेहल मराठे | ४४७ |
| १२३. | 'खेळ' नियतकालिकातील २००० नंतरची कथा | प्रा.वनिता होवाळे | ४५० |
| १२४. | 'मातेरं'- मधून व्यक्त होणारा आदिवासी जीवन संघर्ष | डॉ.चिंतामण धिंदळे | ४५५ |



ISSN No. 2319-6025
जानेवारी-फेब्रुवारी-मार्च, एप्रिल-मे-जून २०२६

| | | | |
|---|---|---|---|
| १२५. | आधुनिक कथेतील पर्यावरणीय जाणीव | श्रीम.गुलनास मुजावर<br>अश्विनी तोरणे | ४५८ |
| १२६. | नीरजा यांच्या कथेतील स्त्री जाणिवा | प्रा.नमिता पाटील | ४६० |
| १२७. | ‘मुक्त झाले मानवी अश्रू’ कथासंग्रहाचे विश्लेषण | प्रा.बळीराम डोके | ४६३ |
| १२८. | मराठी कथांचा समाजशास्त्रीय अभ्यास | प्रा.प्रविण रणबागले | ४६६ |
| १२९. | २००० नंतरची मराठी स्त्रीवादी कथा | अर्चना सुपे | ४६९ |
| १३०. | २००० नंतरच्या स्त्रीवादी कथेची बदलती आशयसूत्रे | सारिका भांगे<br>प्रा.(डॉ.)रमेश शिंदे | ४७२ |
| १३१. | विज्ञान कथा लेखक डॉ.जयंत नारळीकर | अनिता मतिवडे | ४७५ |
| १३२. | श्रीराम काळे यांच्या ‘वस्तीची गाडी’ या कथासंग्रहातील प्राणी चित्रण | सागर गुरव | ४७८ |
| १३३. | सदानंद देशमुख यांची २००० नंतरची ग्रामीण कथा | डॉ.मीरा देठे | ४८२ |
| १३४. | ऐश्वर्य पाटेकर यांची समकाळाचा उभा आडवा छेद घेणारी कथा | डॉ. सुखदेव एकल | ४८६ |
| १३५. | जगण्याचे मूल्यभान जागविणारा कथाकार: नंदकुमार शेडगे | प्रा.(डॉ.)अशोक शेलार | ४८९ |
| १३६. | दोन हजार नंतरच्या मराठी कथेचे वेगळेपण | प्रा.(डॉ.)गिरीश मोरे | ४९२ |
| १३७. | आसाराम लोमटे लिखित ‘आलोक’ कथासंग्रह : एक आकलन | डॉ.आबासाहेब उमाप | ४९७ |
| १३८. | २००० नंतरची किरण गुरव यांची वास्तववादी ग्रामीण कथा | प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे | ४९९ |
| १३९. | ‘पावसात सूर्य शोधणारी माणसं’ मधील मानवी नातेसंबंध | प्रा.वंदना खोराटे | ५०२ |
| १४०. | देहस्वातंत्र्याचा अनिवार्य पैलू : मातृत्व<br>(डॉ. अरविंद संगमनेरकर ‘गोष्टी लग्नाच्या’) | डॉ.जयश्री बाबर | ५०५ |
| १४१. | २१ व्या शतकातील मराठी कथांमधील मानसशास्त्रीय संकल्पनांचा अभ्यास | प्रा.दिलीप पवार | ५०९ |
| १४२. | भारत सासणे यांची दीर्घकथा | डॉ.बाळासो सुतार | ५११ |
| १४३. | २१ व्या शतकातील मराठी कथेतील मॅनोस्फियर : एक अभ्यास | प्रा.(डॉ.)शैलेंद्र काळे | ५१५ |
| १४४. | समकालीन मराठी कथा साहित्यप्रवाहातील स्त्रीवेदना | डॉ.रावसाहेब म. दहे | ५१९ |
| १४५. | २००० नंतरच्या मराठी कथेतील स्थितीगती | डॉ.निता मेश्राम | ५२१ |
| १४६. | मराठी कथा लेखनाचा नवा प्रवाह: ई-कथा | डॉ.संतोष शहापूरकर | ५२४ |
| १४७. | २००० नंतरच्या मराठी कथेतील विषय वैविध्य | प्रा.शहाजी पारसे | ५२७ |
| १४८. | २००० नंतरची मराठी आदिवासी कथा | युवराज घोडे | ५२९ |
| १४९. | २००० नंतरच्या मराठी कथांमधील कथनतंत्र आणि स्त्री अनुभव | प्रा.रेखा धुळप | ५३३ |
| १५०. | एकविसावे शतक व मराठी कथांची वाटचाल... | प्रा.विजय पांगुळ | ५३५ |
| १५१. | एकविसाव्या शतकातील बदलते नातेसंबंध आणि मराठी कथा | प्रा.रामचंद्र ढवळे | ५३७ |
| १५२. | २००० नंतरची दलित कथा | प्रा.विनायक सरदेसाई | ५३९ |
| १५३. | प्रणव सखदेव यांच्या ‘निळ्या दाताची दंतकथा’<br>या कथासंग्रहातील महानगरीय जाणिवा | प्रा.प्रियांका कुंभार | ५४२ |
| १५४. | तंत्रज्ञानाच्या युगातील मराठी कथेचे स्थित्यंतर | डॉ.लक्ष्मण शिंदे | ४४५ |
| १५५. | ‘श्वास’ : कथा ते चित्रपट - एक प्रभावी माध्यमांतर | प्र.प्राचार्य<br>डॉ.महेश गायकवाड | ५४९ |




ISSN No. 2319-6025
जानेवारी-फेब्रुवारी-मार्च, एप्रिल-मे-जून २०२६

| | | | |
|---|---|---|---|
| १५६. | २००० नंतरची मराठी ग्रामीण कथा | डॉ.महेश रणदिवे | ५५२ |
| १५७. | दिनेश काळे यांच्या 'मनाची अभिलाषा' कथासंग्रहातील समाज वास्तव | डॉ.संजयकुमार सरगडे | ५५५ |
| १५८. | महादेव मोरे यांचे कथाविश्व | किरण खोत | ५६० |
| १५९. | अशी वेळ : स्त्री आत्मभानाचे यथार्थ दर्शन घडविणाऱ्या कथा | डॉ.विजया पवार | ५६२ |
| १६०. | दोन हजारोत्तर दलित कथेचे वेगळेपण | डॉ.माधुरी पाटील | ५६५ |
| १६१. | एकविसाव्या शतकातील गोर बंजारा लोककथा | डॉ.सुभाष राठोड | ५६९ |
| १६२. | २००० नंतरच्या मराठी प्रायोगिक कथेचे स्वरूप | डॉ.युवराज देवाळे | ५७३ |
| १६३. | Commercialization and Moral Decay of Education and Politics as Reflected in Balaji Sutar's Don Shatakanchya Sandhyavarchya Nondi | Dr. Bhagwan Lokde | ५७७ |
| १६४. | "Likes," "Shares," and Literary Value: Rethinking Aesthetics in Social-Media-Driven English Fiction | Prof. Shital Maind | ५८० |
| १६५. | Children's Literature in the 21st Century: The Convergence of Technology, Culture and Education | Supriya Chavan-Gaikwad | ५८३ |

# २१ व्या शतकातील मराठी आणि गुजराती दलित कथा : एक अभ्यास

**डॉ.अमोल कवडे**
किसन वीर महाविद्यालय, वाई

**प्रस्तावना**

दलित साहित्य हा भारतीय साहित्यप्रवाहातील एक महत्वाचा आणि परिवर्तनशील साहित्यप्रवाह म्हणून ओळखला जातो. सामाजिक विषमता, जातीय अन्याय, शोषण आणि मानवी अपमानाच्या विरोधात उभे राहिलेलले हे साहित्य केवळ अनुभवकथन न राहता, सामाजिक परिवर्तनाची वैचारिक भूमिका मांडणारे साहित्य ठरले आहे. विशेषतः कथा या साहित्यप्रकारातून दलित जीवनातील वास्तव, संघर्ष आणि आत्मसन्मानाची लढाई प्रभावीपणे व्यक्त झालेली दिसते. २१ व्या शतकात प्रवेश केल्यानंतर भारतीय समाजरचनेत राजकीय, आर्थिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक पातळीवर अनेक बदल घडून आले आहेत. या बदलांचा परिणाम मराठी आणि गुजराती दलित कथांवरही झालेला दिसतो. परंपरागत अस्पृश्यता, जातीय भेदभाव आणि सामाजिक बहिष्कार यांच्यासोबत नव्या स्वरूपातील अन्याय, सत्तेसाठी दलितांचा वापर, आरक्षणामुळे संधी मिळूनही निर्माण होणारे सामाजिक अडथळे, आंतरजातीय विवाहाला होणारा प्रखर विरोध आणि शिक्षणामुळे जागृत झालेला दलित तरुणांचा प्रश्नकर्तेपणा हे विषय या काळातील दलित कथांमध्ये प्रकर्षाने जाणवतात.

मराठी दलित कथांवर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा खोल प्रभाव दिसून येतो. त्यामुळे या कथांमध्ये नकार, विद्रोह, आत्मसन्मान आणि सामाजिक न्यायासाठीचा संघर्ष अधिक स्पष्टपणे व्यक्त होतो. दुसरीकडे, गुजराती दलित कथांमध्ये जातीयता, अस्पृश्यतेची सूक्ष्म रूपे आणि सामाजिक व्यवहारातील भेदभाव यांचे वास्तव अधिक अंतर्मुख आणि वास्तववादी पद्धतीने मांडलेले आढळते. या दोन्ही भाषांतील दलित कथांचा अभ्यास केल्यास प्रादेशिक वैशिष्ट्ये जपतानाच, दलित जीवनाच्या सामायिक संघर्षाचे स्वरूप स्पष्ट होते. म्हणूनच प्रस्तुत शोधनिबंधात २१ व्या शतकातील मराठी आणि गुजराती दलित कथांचा तुलनात्मक अभ्यास करून त्यातील विषयवैविध्य, सामाजिक भान, वैचारिक भूमिका आणि अभिव्यक्तीचे स्वरूप यांचा शोध घेण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. या अभ्यासातून समकालीन दलित साहित्याची दिशा, त्यांचे सामाजिक महत्व आणि परिवर्तनवादी भूमिका अधोरेखित करणे, हा या शोधनिबंधाचा मुख्य उद्देश आहे.

**एकविसाव्या शतकातील मराठी भाषेतील दलित कथांचे स्वरूप**

उत्तम कांबळे यांच्या 'परत्या' कथासंग्रहातील 'नवे स्मशान' या कथेत दलित समाजाला स्मशानभूमीसाठी जागा मिळत नसल्याचे चित्रण आले आहे. या कथेतील दलित समाजातील सिद्धार्थ ही व्यक्तिरेखा परिस्थिती गरीब असल्याने आपल्या आई-वडिलांना मोलमजुरीत मदत करीत असते. एक दिवस विटांचा ट्रॅक्टर पलटी होऊन त्यामध्ये सिद्धार्थचा मृत्यू होतो. त्याचे प्रेत आतमध्ये अडकले असल्याने ते काढण्यासाठी क्रेनची आवश्यकता असल्याचे गावकरी सांगतात. गावातील पाटील, सरपंच, पोलीस सगळे मंत्र्याच्या सभेसाठी बाहेर गेल्याने सिद्धार्थचे प्रेत तीन दिवस तसेच अडकून राहते, शेवटी पोलीस येऊन त्याचे प्रेत काढतात. प्रेत पुरण्यासाठी दलितांना जागा नसल्याने सिद्धार्थचे प्रेत कुठे पुरायचे हा प्रश्न निर्माण होतो. त्यावेळी ज्या पाटलाच्या ट्रॅक्टरखाली सिद्धार्थ मरण पावलेला असतो, तो पाटील केस न करण्याच्या बदल्यात सिद्धार्थचे प्रेत आपल्या शेतात पुरण्याची परवानगी देतो. त्यावेळी डॉ.बाबासाहेबांचा विद्रोह आणि संघर्ष आठवून त्या गावातील नाना 'मी माझे शेत दलितांना स्मशानासाठी देतो' असे सांगतो. एका बाजूला आपण २१ व्या शतकात महासत्तेचे स्वप्न पाहत आहोत आणि दुसऱ्या बाजूला आजही दलितांना मृत्यूनंतरही संघर्ष करावा लागतो यासारखी दुसरी शोकांतिका नाही. दलितांचे मुलभूत प्रश्नही सुटलेले दिसत नाहीत.

दीपध्वज कोसोदे यांच्या 'पंचनामा' या कथासंग्रहातील 'पाटीलकी' या कथेत नव्या शासन निर्णयानुसार परंपरेने चालत आलेल्या पोलीस पाटील या पदासाठी आरक्षण लागू झाल्याने निर्माण झालेल्या संघर्षाचे चित्रण केले आहे. दलित कुटुंबातील तरुण पोलीस पाटील झाल्याने प्रस्थापित पाटील कुटुंबाला पाटीलकी गमवावी लागते याचा त्यांना धक्का बसतो आणि तेथूनच संघर्षाला सुरुवात होते. एक दिवस आदिवासी भिल्लाच्या मुलीवर माजी पोलीस पाटलाचा मुलगा बलात्कार करतो. हे प्रकरण दलित समाजातील नवीन पोलीस पाटील चव्हाट्यावर आणतो, परंतु माजी पोलीस पाटील भिल्लाला पैसे देऊन हे प्रकरण दाबून टाकतो आणि

त्या दलित तरुणावर खोटे आरोप लावून त्याचे पद घालविण्याचा प्रयत्न करतो. प्रस्तुत कथेतून कोसोदे यांनी दलित विरुद्ध सवर्ण अशा स्वरुपाची मानसिकता उभी करण्याचा प्रयत्न केला आहे. आज जरी स्थानिक स्वराज्य संस्था, अथवा शासकीय नोकरी असो याठिकाणी दलित तरुण प्रतिनिधित्व करत असला तरी, खऱ्या अर्थाने त्याला आपले अधिकार वापरता येतात का? हा प्रश्न चिंतन करायला लावणारा आहे हे 'पाटीलकी' या कथेत दिसून येते.

समाजात सत्तेसाठी आपले वर्चस्व निर्माण करत असताना ग्रामीण भागात दलितांचा वापर कशा प्रकारे केला जातो याचे चित्रण वामन होवाळ यांच्या 'शताब्दी' या कथेत येताना दिसते. साखर कारखाना सांभाळत गावचे सरपंच पद भूषवित असताना आबा जाधव राजकीय डावपेच वापरत दत्तू खरात याला साखर कारखान्यात मागासवर्गीय प्रतिनिधी म्हणून घेतात. त्यामुळे समाजात दत्तूची वेगळी ओळख निर्माण होते. दुसऱ्या बाजूला अण्णा कांबळे आणि फाळके पाटील यांना या गोष्टी खटकतात. आणि त्याचा परिणाम म्हणजे बाबासाहेबांच्या जयंतीच्या दोन मिरवणुका निघतात. मिरवणुकी दरम्यान दगडफेक झाल्याने, एकमेकांवर गुन्हे दाखल होतात. त्यामध्ये खरात आणि कांबळे यांची माणसे तुरुंगात डांबली जातात. दलितांना आपलेसे करून घेण्यासाठी प्रस्थापित लोक वेगवेगळ्या प्रकारची आमिषे दाखवून वेळप्रसंगी कशी बदलतात याचे चित्रण तर आले आहेचं शिवाय डॉ.बाबासाहेबांच्या विचारांचे पाईक म्हणून मिरवणारी मंडळी आपल्या स्वार्थासाठी बाबासाहेबांच्या नावाचा उपयोग कशाप्रकारे करतात हे दाखवून समाजातील ढोंगी आणि मतलबी प्रवृत्तीचे चित्रण या ठिकाणी वामन होवाळ यांनी केले आहे.

धर्मराज निमसरकर यांच्या 'ठसठसणाऱ्या जखमा' या कथासंग्रहातील 'पवित्र गुन्हा' या कथेत मराठवाडा विद्यापीठाला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव दिले पाहिजे, यासाठी जे आंदोलन झाले त्याचे चित्रण आले आहे. विद्यापीठ नामांतराच्या प्रश्नावरून शहरातील वातावरण गंभीर झाले असताना नामांतरविरोधी लोक समिती स्थापन करून शहरातील सर्व दुकाने बंद करतात, गरीब लोकांच्या दुकानांची तोडफोड करतात. पण या लोकांना पोलीस थांबवू शकत नाहीत. प्रस्तुत कथेचा नायक विजय कांबळे आणि त्याच्या मित्रांना मात्र कोणताही गुन्हा नसताना पोलीस तुरुंगात टाकतात. परंतु विनोद हा घाबरणाऱ्यांपैकी नव्हता. तो आपल्यावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध आवाज उठवत पोलिसांना त्यांच्या चुकीची जाणीव करून देतो आणि पोलीस स्टेशनमध्ये 'डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा विजय असो', 'मराठवाडा विद्यापीठाला डॉ.आंबेडकरांचे नाव द्यायलाच पाहिजे', 'डॉ.आंबेडकर विद्यापीठ झिंदाबाद' अशा प्रकारच्या घोषणा देतो. डॉ.बाबासाहेबांच्या विचाराने प्रेरित झालेला, आणि शिक्षण घेतलेला दलित तरुण या ठिकाणी आपल्यावर होणाऱ्या अन्यायाला विरोध करणारा 'विजय कांबळे' धर्मराज निमसरकर यांनी प्रस्तुत कथेत साकारला आहे.

**एकविसाव्या शतकातील गुजराती भाषेतील दलित कथांचे स्वरूप**

गुजरती दलित साहित्यामध्ये ज्यांनी महत्वपूर्ण योगदान दिले असे क्रांतिकारी लेखक म्हणजे, हरीश मंगलम होय. त्यांच्या 'तलप' या कथासंग्रहातील '(दायन) दाई' ही कथा अस्पृश्तेवर भाष्य करताना दिसते. ग्रामीण भागात बाळंतपणासाठी दवाखान्यात न नेता अडलेल्या बाईला मोकळे करण्यासाठी 'दाई' असतात आणि या शक्यतो अस्पृश्य समाजातील असतात. या कथेतील बेनिमा ही आंबे विकण्यबरोबर, विनामोबदला दाईची पण भूमिका पार पडत असते. एक दिवस दली चौधरी आपल्या सुनेचे बाळंतपण करण्यासाठी बेनिमाकडे येते. बेनिमा हातातील काम सोडून दालीसोबत जाते आणि तिच्या सुनेची सुटका करते. काही दिवसानंतर दलीचा नातू आणि सून रस्त्यावरून जात असताना बेनिमा दलीच्या नातवाला आंबा देते पण दलीची सून तो आंबा आपल्या मुलाला घेऊ देत नाही. दुसऱ्या एका प्रसंगात बेनिमा आंब्याची पाटी डोक्यावरून घेवून जात असताना, दलीचा नातू, ये चांभारीन बाजूला हो! भ्रष्ट करशील दिसत नाही का? असे म्हणतो. सवर्णांना अडचणीच्या वेळी मदतीसाठी अस्पृश्य चालतात, त्यावेळी त्यांचा विटाळ होत नाही. इतर वेळी मात्र त्यांना दूर लोटले जाते. हाच सामाजिकतेचा धागा पकडून प्रस्तुत कथेत अस्पृश्तेचा विषय मांडला आहे.

प्रवीण गढवी यांच्या 'स्वर्ग उपर मनुष्य' या कथासंग्रहातील 'स्वाभिमान' ही कथा परंपरेने चालत आलेली अस्पृश्यता आणि त्याला विरोध करणारा रमण याचे वास्तवदर्शी चित्रण आले आहे. रमण हा सकाळी पहिल्या बसने शहरात जावून बसस्थानकात संडास साफ करण्याचे काम करून कॉलेजला जात असे आणि रात्री शेवटच्या गाडीने पुन्हा घरी जात असे. एक दिवस कॉलेजला सुट्टी असल्याने त्याचे वडील त्याला मंदिरात ढोल वाजविण्यासाठी जाण्यास सांगतात, परंतु तो त्यास नकार देतो, त्याची वडिलांची देखील त्याने शिकून खूप मोठे व्हावे अशी इच्छा होती. कॉलेजला गेलो तरी संडास साफ करणे आणि घरी राहिलो तरी ढोल वाजविणे यामुळे त्याला स्वतःच्या जातीचा, जन्माचा, समाजाचा आणि व्यवस्थेचा राग येतो. नाईलाजाने तो ढोल वाजविण्यास जातो. आरतीचा कार्यक्रम झाल्यावर सर्वांना नाष्टा दिला जातो. ढोल्याला नाष्टा द्या असे कोणीतरी म्हटल्यावर त्याच्या हातावर सुट्टे पैसे आणि मूठभर पापडी वरूनच टाकू लागताच तो हात मागे घेतो आणि घरी निघून जातो. कॉलेजला शिकत असल्याने तो जास्तच रुबाब करतोय असे

एकजण बोलताच, दुसरा पुढे जावून त्यात भर टाकतो, सरकार म्हणते की, एका ताटात जेवण करा हे ठीक आहे पण यांना नोकरीत घेतल्यावर आपण काय करायचे? यावर सर्वजण हसतात. यावरून आजही अस्पृश्य समाजाकडे पाहण्याचा दुय्यम दृष्टीकोन बदलला नाही हे दिसून येते. अस्पृश्य समाजातील मुलांनी शिकू नये अशा प्रकारची मानसिकता आजही कायम असल्याचे दिसून येते.

धरमभाई श्रीमाळी यांच्या 'भवाई' या कथेत कसलाही गुन्हा नसणाऱ्या आणि जातीने अस्पृश्य असणाऱ्या 'दलभा' ची असह्य परिस्थिती वर्णन केली आहे. महाराष्ट्र ज्याप्रमाणे 'तमाशा' हा कलाप्रकार आहे तशी गुजरातमध्ये भवाई हा कलाप्रकार आहे. यामध्ये काम करणारे कलाकार हे अस्पृश्य असतात, या कथेच्या केंद्रस्थानी तुरी जातीच्या दलभाची कहाणी आहे. एक दिवस कला सादर करत असताना रूपकंवरबा एक मुलगी त्याच्या प्रेमात पडते, ती उच्च कुळातील असल्याने दलभाला भीती वाटते. असेच एक दिवस रात्रीच्या वेळी खेळ चालू असताना अचानक दिवे विझल्याने सर्वत्र अंधार पडतो आणि याच अंधाराचा फायदा घेत रूपकंवर दलभाचा हात पकडून लग्नाची मागणी घालते. दलभा तिला नकार देतो. पण ही घटना तिचा बाप पाहतो आणि तिला फरफटत नेतो आणि तिला मारून टाकतो. देशाच्या स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करत असताना, आंतरजातीय विवाहाला होत असणारा विरोध पाहून खरचं आज जातीयता नष्ट झाली आहे का? या प्रश्नांच्या संदर्भात आजही आपण अनुत्तरीत असल्याचे या कथेच्या माध्यमातून दिसून येते.

प्रवीण गढवी यांची स्वर्ग उपर मनुष्य या कथासंग्रहातील 'टेस्ट ट्यूब बेबी' ही कथा आधुनिक विचारसरणीवर आधारित असली तरी, जातीयता वेगवेगळ्या प्रकारे कशी डोकावते याचे चित्रण यामध्ये येताना दिसते. कोणत्याही प्रकारचे जात -पात न मानणारे असिमचे कुटुंब, वडील भौतिकशास्त्राचे प्राध्यापक त्यामुळे त्यांनी स्वतःला आणि असिमला देखील जानवे घातले नव्हते. उच्चशिक्षित असणाऱ्या असिमच्या लग्नासाठी त्याच्या आई वडिलांना घाई झालेली परंतु लग्न जमत नाही, अशात संकेतस्थळावरून त्यांना पत्रकार असणारी रीमा पसंद पडते. रीमा ब्राम्हण असल्याने जास्त चौकशी न करता मोठ्या थाटात असिम आणि रीमा यांचे लग्न होते. परंतु लग्नाला पाच वर्षेझाले तरी त्यांना मुलबाळ होत नाही. डॉक्टरच्या प्रयत्नाला यश यत नाही. रीमा मात्र प्रचंड दुःख घेऊन जीवन जगत असते, तिचे दुःख तिलाच माहित असते. लग्नापूर्वी तिचे आणि सुभाष यांचे एकमेकावर प्रेम असते, परंतु सुभाषचा चप्पलचा व्यवसाय असल्याने त्यांच्या लग्नाला रीमाच्या घरचे विरोध करतात. त्यावेळी रीमा तीन महिन्याची गरोदर असते. घरचे तिच्याकडून जबरदस्तीने गर्भपात करून घेतात, आणि त्याचाच परिणाम म्हणून रीमाचा गर्भ राहत नव्हता हे फक्त रीमाला माहित असते. इकडे नातवाचे तोंड पाहण्यासाठी असिमचे आई-वडील उतावीळ झालेले असतात. टेस्ट ट्यूब बेबीचा पर्याय निवडला जातो पण त्यामध्येदेखील अपयश येते. शेवटी डॉक्टरच्या सल्ल्याने गर्भाशय भाड्याने घेण्याचा सल्ला दिला जातो. एका गरीब स्त्रीचा शोध घेत तिला नवीन घर आणि एक लाख रु देण्याच्या बदल्यात तिचे गर्भाशय भाड्याने घेतले जाते. त्यावेळी असिमची आई त्या स्त्रीची जात कोणती आहे असे विचारते. 'टेस्ट ट्यूब बेबी' ही प्रवीण गाढवी यांची कथा आधुनिकतेची कास धरणारी असली तरी आजच्या विज्ञानयुगात देखील जातीयता वेगवेगळ्या स्वरुपात कशी व्यक्त होते हे दिसून येते.

**मराठी आणि गुजराती दलित कथांचे तुलनात्मक स्वरूप**

२१ व्या शतकातील मराठी मराठी आणि गुजराती दलित कथा ही समकालीन समाजातील जातीय वास्तवाचे वेगवेगळ्या पातळ्यावर दर्शन घडविताना दिसते. मराठी दलित कथेमध्ये दलित समाजाच्या मुलभूत मानवी हक्कांचा प्रश्न अधिक आक्रमक आणि संघर्षशील स्वरुपात व्यक्त होताना दिसतो. स्मशानासाठी जागा नाकारली जाणे यांसारख्या प्रसंगात बाबासाहेबांच्या विचारांनी प्रेरित झालेली दलित व्यक्ती पुढाकार घेऊन स्मशानासाठी जागा उपलब्ध करून देते, हा प्रसंग मराठी दलित कथेमधील आत्मसन्मान, नकार आणि संघर्षशीलता अधोरेखित करतो. आरक्षणामुळे पोलीस पाटीलसारख्या अधिकारपदावर आलेल्या दलित तरुणाला प्रस्थापित समाजाकडून हेतुपरस्पर अडचणीत आणले जाणे, राजकारणासाठी दलितांचा वापर करून आणि विद्यापीठ नामांतर प्रश्नावर अन्यायाविरुद्ध उघडपणे विरोध व्यक्त करणे हे विषय मराठी दलित कथांना स्पष्टपणे वैचारिक, आंदोलनशील आणि आंबेडकरी विचारधारेशी जोडतात. त्यामुळे मराठी दलित कथा या केवळ अनुभवकथन न राहता सामाजिक परिवर्तनाची मागणी करणाऱ्या साहित्यिक अभिव्यक्ती ठरतात.

याच्या तुलनेत गुजराती दलित कथांमध्ये अस्पृश्यता, आंतरजातीय विवाहाला होणारा सामाजिक विरोध आणि जातीय मानसिकतेची खोलवर रुजलेली मुळे यांचे सूक्ष्म, वास्तववादी चित्रण आढळते. येथे संघर्ष अनेकदा थेट आंदोलनाच्या रुपात न येते, दैनंदिन जीवनातील अपमान, बहिष्कार आणि सामाजिक नकार यातून व्यक्त होतो. त्यामुळे गुजराती या समाजातील जातीय संरचनेची आतमध्ये दडलेली क्रूरता उलगडून दाखवितात.

**समारोप**

एकूणच मराठी आणि गुजराती दलित कथांमधील विषय हे प्रादेशिक, सामाजिक वास्तवाशी निगडीत असले तरी दोन्ही परंपरांचा केंद्रबिंदू दलितांचे मानवी स्वातंत्र्य, आत्मसन्मान आणि समतेचा आग्रह हाच आहे. मराठी दलित कथा अधिक संघर्षशील आणि वैचारिक आंदोलनाशी जोडलेल्या दिसतात, तर गुजराती दलित कथा सामाजिक व्यवहारातील जातीयतेचे सूक्ष्म स्वरूप उघड करतात. म्हणूनच या दोन्ही भाषांतील दलित कथा परस्पुरक ठरत, भारतीय समाजातील अन्यायाच्या व्यापक वास्तवाचे सखोल आणि चिकित्सक चित्रण करताना दिसतात.

**संदर्भ**


१. कांबळे उत्तम, परत्या, मनोविकास प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २०१०

२. कासोदे दीपध्वज, पंचनामा, सुविद्या प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २०१०

३. होवाळ वामन, ऑडीट, निशिराज पब्लिकेशन, पुणे, प्रथमावृत्ती, २००२

४. निमसरकर धर्मराज, उसवलेलं आकाश, दिलीपराज प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती, २०२१०

५. कलांबा मनोज, दलित वार्ताओ, नवभारत साहित्य मंदिर अहमदाबाद, द्वितीय आवृत्ती, २०११

६. जोशी अरुणा, (अनु) गुजराती दलित कथा, (संपा) हरीश मंगलम, दिलीपराज प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, २००८

७. गढवी प्रवीण, स्वर्ग उपर मनुष्य, रन्नादे प्रकाशन, प्रथम आवृत्ती, २००९

८. शब्दसृष्टी, दलित साहित्य विशेषांक, नोव्हेंबर, २०२३